# NTS-X L.T.1

## NATIONAL TALENT SEARCH EXAMINATION, 2016-17

## राष्ट्रीय प्रज्ञा शोध परीक्षा, २०१६-१७

| CENTRE CODE केंद्र संकेतांक | 3 | 9 | | | | |
|---|---|---|---|---|---|---|

| SEAT NO. आसन क्रमांक | 2 | 3 | 9 | 1 | 7 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

## STATE LEVEL EXAMINATION — QUESTION BOOKLET

## राज्यस्तरीय परीक्षा—प्रश्नपुस्तिका

## LANGUAGE TESTING

## भाषा कौशल्य

**CLASS X / इयत्ता १०वी**

**MEDIUM :- MARATHI (मराठी)**

**TOTAL PAGE 1–20**

**एकूण पाने 1–20**

**DATE : 6 NOVEMBER 2016, DAY : SUNDAY**

**दिनांक : ६ नोव्हेंबर २०१६, वार : रविवार**

[Time : 11.45 A.M. to 12.30 P.M.]

[वेळ : ११.४५ ते १२.३०]

Maximum Marks : 50

एकूण गुण : ५०

Time : 45 Minutes

वेळ : ४५ मिनिटे

Total Pages : 20

एकूण पाने : २०

SEAL

## परीक्षार्थींसाठी सूचना

प्रश्नांची उत्तरे देण्यापूर्वी पुढील सूचना काळजीपूर्वक वाचा. तुमची उत्तरे संयुक्त उत्तरपत्रिकेवर लिहावयाची आहेत :

(1) कृपया तुमचा केंद्र संकेतांक आणि आसन क्रमांक आकड्यामध्ये सुस्पष्ट लिहा. (एका चौकटीत एकच अंक याप्रमाणे) स्वत:चा आसन क्रमांक लिहिण्यापूर्वी तो बरोबर असल्याची खात्री करून घ्या. कोणताही रकाना रिक्त राहणार नाही याची दक्षता घ्या. प्रश्नपुस्तिका व उत्तरपत्रिका या वरील चौकटीत आसन क्रमांक व केंद्र संकेतांक यातील प्रत्येक अंक आणि शून्यसुद्धा योग्य जागी लिहा.

उदाहरणार्थ :

| CENTRE CODE केंद्र संकेतांक | 3 | 9 | | | | |
|---|---|---|---|---|---|---|

| SEAT NO. आसन क्रमांक | 2 | 3 | 9 | 1 | 7 | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|

(2) प्रत्येक प्रश्नाला **एक** गुण आहे.

(3) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत म्हणून उत्तरे लिहिण्यापूर्वी संपूर्ण प्रश्नपत्रिका वाचत बसू नका.

(4) पहिल्या प्रश्नापासून सुरुवात करा आणि एकामागून एक प्रश्न सोडवीत शेवटपर्यंत प्रश्न सोडवा.

(5) एखाद्या प्रश्नाचे उत्तर येत नसेल तर त्यावर जास्त वेळ घालवू नका. पुढचे प्रश्न सोडविण्यास घ्या. सर्व प्रश्न सोडवून झाल्यावर उरलेल्या वेळात राहून गेलेल्या प्रश्नांवर तुम्हाला पुन्हा विचार करता येईल.

(6) प्रश्न सोडविण्यासाठी तुम्हाला मिळणारा वेळ विचारात घेऊन त्याचा जास्तीत जास्त चांगल्या प्रकारे उपयोग करा. कच्चे काम प्रत्येक पृष्ठावर दिलेल्या चौकटीतच करावयाचे आहे.

(7) लक्षात ठेवा तुम्हाला उत्तरे नोंदविण्यासाठी "**भाषा कौशल्य**" **(Language Testing)** चीच उत्तरपत्रिका मिळाली आहे याची खात्री करा.

(8) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरासाठी प्रश्नपुस्तिकेमध्ये पर्याय दिले आहेत. त्यापैकी तुम्हाला योग्य वाटेल त्या पर्यायाचा क्रमांक पहा व त्या क्रमांकाच्या वर्तुळात काळे करून उत्तर द्या. मात्र हे काम तुमच्या उत्तरपत्रिकेवर योग्य प्रश्नापुढे करावयाचे आहे **प्रश्नपुस्तिकेवर** नाही.

(9) कृपया या पुस्तिकेत केंद्र संकेतांक आणि आसन क्रमांक व कच्चे काम याखेरीज अन्य काहीही लिहू नका.

(10) आता प्रश्नांची उत्तरे देण्यास सुरुवात करा.

## भाषा कौशल्य—मराठी

**प्रश्न 1-5 : खालील उतारा वाचून त्याखालील प्रश्नांच्या उत्तरांचे पर्याय दिलेले आहेत त्यातून अचूक पर्याय निवडा.**

कष्टांशिवाय जीवन नाही, त्यागाशिवाय सुख नाही. अशी वचनं जिनं आत्मसात केली होती. तिच्यासाठी 'पतिव्रता' हा शब्द सर्वार्थानं योग्य वाटावा असा. पतीनं घेतलेल्या, स्वीकारलेल्या व्रतासाठी समर्पण करणारी 'साधना आमटे' सर्वांची ताई झाली. सौ. साधनाताई आमटे. वेळेवर योग्य ते उपचार न झाल्याने, महारोग झालेल्या तुळशीरामाचा मृत्यू झालेला पाहून दु:ख झालेल्या बाबांनी ताईंजवळ आपल्या दु:खाची कबुली दिली आणि या दु:खाची तीव्रता कमी कशी करता येईल, वेदनेचे आनंदात कसे रूपांतर होईल हा ध्यास या पतीपत्नीला लागला, या ध्यासाचा श्वास झाला आणि अशा समर्थ व्यक्तिमत्त्वामुळे निर्माण झालं आनंदवन!

**— चित्रलेखा पुरंदरे**

1. बाबांनी ताईंजवळ कोणती कबुली दिली ?

(1) कष्टाची (2) त्यागाची

(3) दु:खाची (4) आनंदाची

2. स्वीकारलेल्या व्रतासाठी समर्पण कोणी केले ?

(1) साधना आमटे (2) बाबा आमटे

(3) तुळशीराम (4) कुष्ठरोगी

3. पतीपत्नीला कोणता ध्यास लागला होता ?

(1) त्यागाशिवाय सुख मिळविण्याचा (2) व्रतासाठी समर्पण करण्याचा

(3) वचनं आत्मसात करण्याचा (4) वेदनेचे आनंदात रूपांतर करण्याचा

4. समर्थ व्यक्तिमत्त्वामुळे काय निर्माण झाले ?

(1) जग निर्माण झाले (2) जंगल निर्माण झाले

(3) आनंदवन निर्माण झाले (4) भूमी निर्माण झाली

5. वरील उताऱ्यास कोणते शीर्षक अधिक समर्पक वाटते ?

(1) भयंकर महारोग (2) साधनाताईंचे कार्य

(3) वेदना व दु:ख (4) कष्टाचे जीवन

**प्रश्न 6-10 : खालील कविता वाचून त्याखालील प्रश्नांच्या उत्तरांचे पर्याय दिलेले आहेत त्यातून अचूक पर्याय निवडा.**

डोळ्यापुढती येतो जेव्हा आठवणीचा गाव
विरून जाती वाऱ्यावरती बेचैनीचे भाव
वळण वाकड्या नदीत आहे खळखळते पाणी
नजर पाखरू भिरभिरे पण अबोल होई वाणी
बाभळीच्या बनाशेजारी आंब्याची आमराई
गर्द सावली पहुडलेली वारा गातो अंगाई
हिरवेगार पीक नाचते कळ्याभोर शिवारी
रेंगाळते मन त्या ठिकाणी पाय नेती माघारी
गावापासून केले दूर वीतभरच्या पोटाने
तरी ओळख होतसे अमुची गावाच्या नावाने

**— अनिल पाटील**

6. कवीच्या बेचैनीचे भाव कुठे विरून जातात ?

(1) पावसावरती (2) वाऱ्यावरती

(3) गाण्यावरती (4) धुक्यावरती

7. वारा अंगाई कुठे गातो ?

(1) आमराई
(2) शिवारी
(3) गावी
(4) घरी

8. कवीचे मन कशात रेंगाळते आहे ?

(1) हिरव्यागार पिकात
(2) बाभळीच्या बनात
(3) काळ्याभोर शिवारात
(4) मनाच्या गाभाऱ्यात

9. कवीच्या डोळ्यांपुढे काय येते ?

(1) आजोबाचा गाव
(2) स्वप्नातला गाव
(3) कल्पनेतला गाव
(4) आठवणीतला गाव

10. गावापासून कवीला दूर कोणी केले ?

(1) ओळखीच्या माणसाने
(2) आमराईच्या सावलीने
(3) वीतभर पोटाने
(4) खळखळत्या पाण्याने

11. पुढील वाक्यांचा क्रम बदललेला आहे. अर्थपूर्ण परिच्छेदासाठी योग्य क्रम लावा :

(क) गंगाधर सरपंच झाला.

(ख) बनपूर गावात आज चर्चेला उधाण आलं होतं.

(ग) लहान थोरांच्या तोंडी एकच विषय होता.

(घ) गंगाधरची गावातून मिरवणूक काढण्यात आली.

(1) (क)–(ख)–(ग)–(घ)
(2) (ख)–(ग)–(क)–(घ)
(3) (ख)–(घ)–(क)–(ग)
(4) (घ)–(ग)–(ख)–(क)

12. पोटापुरता पसा पाहिजे। नको पिकाया पोळी।

या काव्यपंक्तीतील अलंकार कोणत्या प्रकारातील आहे ?

(1) यमक
(2) उपमा
(3) अनुप्रास
(4) व्यतिरेक

13. ‘हरिपाठाचे अभंग’ या काव्यरचनेचे कवी कोण आहेत ?

(1) संत तुकाराम (2) संत कान्होपात्रा

(3) संत नामदेव (4) संत ज्ञानेश्वर

14. ‘तीक्ष्ण’ या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द खालील पर्यायामधून ओळखा :

(1) टोकदार (2) निबर

(3) बोथट (4) मऊ

15. ‘फटका’ हा नवा काव्यप्रकार कोणी रूढ केला ?

(1) अनंत फंदी (2) बालकवी

(3) कुसुमाग्रज (4) रामजोशी

16. लेखननियमांनुसार खालीलपैकी **अचूक** शब्द कोणता ?

(1) निरवाह (2) निर्वाह

(3) र्निवाह (4) नीरवाह

17. 'आधुनिक वाल्मिकी' म्हणून कोणास ओळखले जाते ?

(1) बा. भ. बोरकर (2) नारायण सुर्वे

(3) केशवकुमार (4) ग. दि. माडगूळकर

18. खालील वाक्य कोणत्या प्रकारचे आहे ?

**वाक्य** – आता मी जास्त दिवस इथे राहू शकत नाही.

(1) आज्ञार्थी (2) विधानार्थी

(3) प्रश्नार्थी (4) नकारार्थी

**19.** 'महादेव' या सामासिक शब्दातील समास कोणता ?

(1) कर्मधारय (2) द्विगू

(3) द्वंद्व (4) अव्ययीभाव

**20.** महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री कोण होते ?

(1) यशवंतराव चव्हाण (2) वसंतराव नाईक

(3) वसंतदादा पाटील (4) पृथ्वीराज चव्हाण

**21.** चिपळूण येथे भरलेल्या ८६व्या अखिलभारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष कोण होते ?

(1) विंदा करंदीकर (2) शांता शेळके

नागनाथ कोत्तापल्ले (4) नारायण सुर्वे

22. मराठीतील पहिले चरित्रकार म्हणून कोणास ओळखले जाते ?

(1) म्हाइंभट (2) गोविंदप्रभू

(3) चक्रधरस्वामी (4) नागदेवाचार्य

23. लोकमान्य टिळक यांनी कोणत्या वृत्तपत्रातून समाज जागृतीचे कार्य केले ?

(1) दर्पण (2) काळ

(3) केसरी (4) बहिष्कृत भारत

24. 'सलगी करणे' या वाक्प्रचाराचा योग्य अर्थ कोणता ?

(1) एकोपा करणे (2) स्वतंत्र राहणे

(3) ओळख असणे (4) मैत्री करणे

25. 'Programme' या पारिभाषिक शब्दाचा मराठी अर्थ कोणता ?

(1) मनोरंजन (2) कार्यक्रम

(3) शुभारंभ (4) उद्घाटन

26. त्या दिवसांत आम्ही वाट पाहायचो होळीची आणि रंगांच्या धुळवडीची.

या वाक्यातील 'आणि' हा शब्द कोणता अव्यय आहे ?

(1) क्रियाविशेषण (2) उभयान्वयी

(3) शब्दयोगी (4) केवलप्रयोगी

27. लेखननियमांनुसार खालीलपैकी कोणते वाक्य अचूक **नाही** ?

(1) प्रार्थनेची शेवटची ओळ सुरू झाली होती

(2) उच्चनिचतेची जाणिव नव्हती

(3) तसा तो गाल व डोळे हातानेच पुसू लागला

(4) वर्गशिक्षक प्रार्थना म्हणत मंद पावलांनी वर्गात फिरत होते

**28.** 'आरती प्रभू' या नावाने काव्यलेखन कोणी केले ?

(1) चिं. त्र्यं. खानोलकर (2) मधुकर केचे

(3) भुजंग मेश्राम (4) प्रज्ञा पवार

**29.** खाली दिलेल्या वाक्यातील अधोरेखित वाक्प्रचारासाठी दिलेल्या पर्यायांपैकी कोणता पर्याय योग्य आहे ?

**वाक्य** – आभाळ फुटल्यासारखं डोळं गळू लागलं.

(1) रिमझिम पाऊस पडणे (2) पिरपिर पाऊस पडणे

(3) जोराचा पाऊस पडणे (4) रिपरिप पाऊस पडणे

**30.** पुढील वाक्य कोणत्या बोलीभाषेतील आहे ?

**वाक्य** – माले मातर हसू येत व्हतं.

(1) मालवणी (2) अहिराणी

(3) वारली (4) झाडी

प्रश्न 31-40 : खाली दिलेल्या गद्य उताऱ्यातील रिकाम्या जागी दिलेल्या पर्यायातून योग्य पर्यायाची निवड करा.

स्वामीजी एका (31) .................................... साधकाचे जीवन जगले. रामकृष्ण सेवा संघाची (32) .................................... करून त्यांनी उदात्त विचारांना गती देणारी एक (33) .......................... उभी केली. रामकृष्ण संघ हे (34) .................................... मोठे योगदान आहे. कोलकात्यापासून (35) .................................... विविध केंद्रे अविरत कार्य करीत आहेत. विवेकानंद हे एक (36) .................................... राहिलेले नसून, ते तेजस्वी (37) .......................... झाले आहे. आपल्या देशयात्रेची समाप्ती त्यांनी कन्याकुमारीच्या (38) .................................... शिलाखंडावर केली. तेथे ते तीन दिवस व तीन रात्री (39) .......................... अवस्थेत बसून राहिले. तेथे त्यांना एक (40) .......................... घडले.

31. (1) संन्यासी (2) व्रतस्थ
(3) तटस्थ (4) मध्यस्थ

32. (1) संघटना (2) नोंदणी

(3) उभारणी (4) स्थापना

33. (1) फळी (2) योजना

(3) यंत्रणा (4) समिती

34. (1) दयानंदाचे (2) स्वामीनंदाचे

(3) नित्यानंदाचे (4) विवेकानंदाचे

35. (1) कन्याकुमारीपर्यंत (2) काश्मिरपर्यंत

(3) बंगालपर्यंत (4) केरळपर्यंत

36. (1) व्यक्ती (2) विचार

(3) व्यक्तिमत्त्व (4) स्वामी

37. (1) मार्गदर्शन (2) जीवनदर्शन

(3) गुरुदर्शन (4) निसर्गदर्शन

38. (1) विस्तीर्ण (2) ऐसपैस

(3) अवाढव्य (4) दिमाखदार

39. (1) मौन (2) एकाग्र

(3) शांतचित्त (4) विचारमग्न

40. (1) मनन (2) चिंतन

(3) स्फुरण (4) जीवन

41. 'तो मी नव्हेच' या नाटकाचे लेखक कोण आहेत ?

(1) प्र. के. अत्रे (2) पु. ल. देशपांडे

(3) रा. ग. गडकरी (4) वि. वा. शिरवाडकर

**42.** 'संत निवृत्तीनाथ' यांची समाधी कोठे आहे ?

(1) देहू (2) आळंदी

(3) त्र्यंबकेश्वर (4) मंगळवेढा

**43.** 'Lyric' या पारिभाषिक शब्दाचा मराठी अर्थ कोणता ?

(1) संगीत (2) गायक

(3) गीतकार (4) भावगीत

**44.** 'वि. स. खांडेकर' यांच्या कोणत्या कादंबरीला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला ?

(1) ययाती (2) क्रौंचवध

(3) अश्रू (4) दोन ध्रुव

45. गद्यपाठाच्या आधारे वाक्य पूर्ण करा.

एकदा आईबापांनी कन्यादान करून तुमचे हातावर ..................

(1) तीर्थ सोडले म्हणजे झाले

(2) पाणी सोडले म्हणजे झाले

(3) पैसे ठेवले म्हणजे झाले

(4) हात मारले म्हणजे झाले

46. मराठी भाषेतील पहिला चरित्रग्रंथ कोणता ?

(1) गोविंदप्रभू चरित्र

(2) श्रीकृष्णचरित्र

(3) लीळाचरित्र

(4) दत्तात्रयप्रभू चरित्र

47. 'होनाजी बाळा' यामधील 'बाळा' कोणास म्हटले आहे ?

(1) बाळशास्त्री जांभेकर

(2) बाळा करंजकर

(3) मोरोपंत

(4) राम जोशी

48. 'पंचवटी' या शब्दाचा समास ओळखा.

(1) द्विगू समास

(2) द्वंद्व समास

(3) कर्मधारय समास

(4) बहुव्रीही समास

49. "महाराज, चित्रे आवडली ?" हे वाक्य कोणी उद्गारले आहे ?

(1) चित्रगूप्त

(2) शकुंतला

(3) महाराज

(4) रविवर्मा

50. 'तालुक्याचे' या शब्दाची विभक्ती ओळखा.

(1) द्वितीया

(2) षष्ठी

(3) पंचमी

(4) सप्तमी

कच्च्या कामासाठी फक्त

SEAL